मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी कॅम्प मधील व्यापारी अण्णांच्या पाठीशी..!

## कॅम्प मधील व्यापाऱ्यांचा अण्णा बनसोडे यांच्याबद्दल आपुलकीचा सुर : व्यापाऱ्यांच्या कोणत्याही अडचणीमध्ये आमदार अण्णा बनसोडे कायम खंबीरपणे पाठीशी

**पिंपरी | प्रतिनिधी**

व्यापाऱ्यांच्या कोणत्याही अडचणीमध्ये आमदार अण्णा बनसोडे कायम खंबीरपणे पाठीशी उभे राहतात. कोणत्याही व्यापाऱ्याला कधीही त्रास न दिलेला आमदार म्हणून त्यांची सर्व व्यापाऱ्यांमध्ये प्रतिमा आहे. त्यामुळे पिंपरी कॅम्प मधील सर्व व्यापारी आमदार अण्णा बनसोडे यांच्या पाठीशी आहेत. कॅम्प मधील व्यापाऱ्यांनी आमदार अण्णा बनसोडे यांच्याबद्दल आपुलकीचा सूर आवळला.




राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले), रासप या महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी बुधवारी (दि. 13) पिंपरी कॅम्प परिसरात प्रचार दौरा केला. लिंक रोड येथून पदयात्रेला सुरुवात झाली. देवी लिंक, पत्रा शेड, रमाबाई नगर, भाटनगर, बौद्ध नगर, आंबेडकर कॉलनी, भीमनगर, सेनेटरी चाळ, भाजी मंडई, फुल मार्केट, फळ मार्केट, शगुन चौक, डिलक्स चौक, संजय गांधीनगर, मिलींदनगर, सुभाष नगर, शास्त्री नगर, साई चौक या भागातून ही पदयात्रा काढण्यात आली.

यावेळी माजी उपमहापौर, संदीप वाघेरे, दीपक मेवानी, संजय अवसरमल, बबलू सोनकर, रमेश शिंदे, नजीर मुलानी, संतोष वडमारे, अरुण टाक, जगन्नाथ साबळे, गौतम रोकडे, प्रवीण वडमारे,अरुण वडमारे, रमेश शिंदे, भाऊसाहेब अभंग, अस्लम मणियार, सुनील रोकडे, सचिन सुर्वे, राजू सावन, निलेश निकाळजे, सूर्यकांत उबाळे, श्रीराम कांबळे, महेश तुपे, राजू ओव्हाळ, रोहित जाधव, बापूसाहेब गाडे, राम शिंगारे आदी उपस्थित होते.

सर्व व्यापाऱ्यांनी आमदार अण्णा बनसोडे यांना आपल्या दुकानात नेऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. पिंपरी मधील व्यापारी आणि अण्णा बनसोडे हे अतिशय जिव्हाळ्याचे नाते आहे, हे या प्रचार दौऱ्यात दिसून आले. प्रत्येक व्यापाऱ्याशी आमदार अण्णा बनसोडे चर्चा करत होते. भाजी मंडई येथे आल्यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी कार्यकर्त्यांसोबत चहा घेतला. त्यावेळी भाजी मंडई मधील पत्र्याचे शेड अण्णा बनसोडे यांनीच बांधून दिल्याची आठवण भाजी विक्रेत्या महिलांनी करून दिली. शेडमुळे व्यवसायासाठी मोठी मदत होते. सावलीमध्ये बसून भाजी विक्री करता येते, असे भाजी विक्रेत्यांनी सांगितले.

> पिंपरी कॅम्प परिसरातील सर्व झोपडपट्ट्यांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. यामुळे इथल्या प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र आणि हक्काचे पक्के घर मिळणार आहे. एखाद्या कुटुंबात दोन भाऊ असतील तर त्यांना प्रत्येकाला घर मिळेल. भाजी मंडई मध्ये 350 गाळ्यांसाठी शेड उभारण्यात आले आहे. तिथल्या सर्व विक्रेत्यांना आहे त्या ठिकाणी पक्के गाळे बांधून दिले जाणार आहेत.
> - आमदार अण्णा बनसोडे, महायुतीचे उमेदवार, पिंपरी विधानसभा मतदारसंघ

---

# मी 4158 कोटींचा विकास निधी तालुक्यासाठी आणला, तुम्ही 8000 कोटींचा शब्द तरी द्या

## आमदार सुनील शेळके यांनी दिले विरोधकांना खुले आव्हान

**पिंपरी | प्रतिनिधी**

मी मावळ तालुक्यासाठी ४,१५८ कोटींचा विकास निधी आणून दाखवला, तुम्ही निदान ८,००० कोटींचा निधी आणण्याचा शब्द तरी मावळच्या जनतेला द्या, असे खुले आव्हान मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस- भाजप- शिवसेना- आरपीआय- एसआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांनी विरोधकांना दिले.



आमदार शेळके यांनी मंगळवारी नवलाख उंब्रे, बधलवाडी, परिटवाडी, जाधववाडी, मिंडेवाडी व सुदुंबरे या गावांचा प्रचारदौरा करीत जनसंवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. ठिकठिकाणी वाजत-गाजत मिरवणुकीने, पुष्पवृष्टी करीत, फटाके वाजवून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. केवळ सुनिल शेळकेवर आरोप करून, त्यांना बदनाम करण्यामुळे तुम्ही ही निवडणूक जिंकू शकणार नाही, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. राज्यात महायुतीचे पुन्हा सरकार येणार आहे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. केंद्रातही महायुतीचेच सरकार आहे. ( उर्वरित पान २ वर )

### परिटवाडीत साडेनऊ कोटींची विकासकामे..

» परिटवाडीतील विकासकामांसाठी आपण तब्बल साडेनऊ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे आमदार शेळके यांनी सांगितले. निवडणुकीनंतर गावच्या मंदिरासाठी देखील भरीव मदत करण्याचा शब्द शेळके यांनी यावेळी दिला. त्यावेळी तुकाराम पापळ, संदीप पापळ, भगवान बदले, सागर जाधव आदी मान्यवरांसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोक्याला हेल्मेट असेल तरच मिळेल महापालिकेत प्रवेश..

## प्रवेशद्वारासमोरच सूचनेचा प्रशासनाने लावलाय फलक...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील सर्व अधिकारी तसेच कर्मचारी यांना दुचाकी वापरताना हेल्मेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्यथा महापालिकेत प्रवेश दिला जाणार नाही, असा आदेश प्रशासनाने काढला आहे. नियमाचे उल्लंघन करणा-या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.



यासंदर्भात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी यापूर्वीच पिंपरी-चिंचवड महापालिकेला निर्देश दिले आहेत, हेल्मेटचा वापर न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर संबंधित कार्यालय प्रमुखांनी शिस्तभंगाची तसेच दंड वसुलीची कार्यवाही करावी. त्याचबरोबर याची नोंद मूळ सेवापुस्तकात घ्यावी, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली असून महापालिकेच्या प्रवेशद्वारावर अधिकारी व कर्मचारी यांच्या आकलनासाठी यासंदर्भात बोर्ड लावण्यात आला आहे. महापालिकेत प्रवेश करताना आणि बाहेर पडताना दुचाकीचालक अधिकारी, कर्मचारी यांनी हेल्मेट सक्तीने परिधान करावे, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही, असे बोर्डवर नमूद करण्यात आले आहे.

# आयटी कंपनीच्या बिल्डरविरुद्ध रहिवासी मैदानात

## कुमार कृती सोसायटीजवळ 'सायबेज'च्या बांधकाम साइटवर प्रदूषण नियमांच्या उल्लंघनाचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

कुमार कृती सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळ सायबेज या आयटी कंपनीचे बांधकाम सुरू आहे. बांधकाम साइटवर प्रदूषण नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप या सोसायटीतील नागरिकांचा आहे. बिल्डर आणि सायबेज कंपनीविरुद्ध महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (एमपीसीबी) तक्रार करूनही या प्रकरणात काहीच कारवाई न झाल्यामुळे संतापलेले रहिवासी आता बिल्डर आणि सायबेज कंपनीविरुद्ध मैदानात उतरले आहेत.

कुमार बिल्डर्सने जी जागा 'सायबेज'ला विकली, ती बिगर रहिवासी कामांसाठी देणार नसल्याचे कुमार कृती सोसायटीच्या रहिवाशांना सांगितले होते. मात्र, बिल्डरने आपले आश्वासन न पाळले नाही. यामुळे हा वाद निर्माण झाला आहे. कुमार कृती सोसायटीच्या रहिवाशांनी या प्रकरणी आपल्या सोसायटीच्या बिल्डरला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. कुल नॉव्हेल हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड (कुमार बिल्डर्स) तसेच सायबेज सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड यांचा यात समावेश आहे.



### सायबेज म्हणते, आमच्याकडे परवानगी

» एमपीसीबीने सुरुवातीला कठोर अटी घालत सायबेजला १२ जुलै रोजी पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने बांधकामासाठी संमती दिली होती. तथापि १२ ऑगस्ट आणि १० ऑक्टोबर रोजी केलेल्या तपासणीत चिंताजनक विसंगती आढळून आली. ही बाब रहिवाशांनी ध्यानात आणून देऊनही एमपीसीबीकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. बांधकामामुळे होणाऱ्या वायू आणि ध्वनिप्रदूषणाबाबत रहिवाशांनी गंभीर तक्रारी केल्या. सायबेजने पर्यावरणीय नियमांचे पालन केल्याचा दावा खोटा असल्याचा आरोप कुमार कृती सोसायटीच्या रहिवाशांनी 'सीविक मिरर'सोबत बोलताना केला. दुसरीकडे, सायबेजच्या प्रतिनिधीने सांगितले की त्यांच्याकडे ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्या आहेत. शिवाय ते एमपीसीबीला देण्यासाठी उत्तर तयार करत आहेत.

या वर्षी ऑक्टोबरमध्ये एमपीसीबीने सायबेज सॉफ्टवेअर प्रायव्हेटला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. कंपनीला वडगाव शेरी परिसरात नवीन इमारतीच्या बांधकामादरम्यान पर्यावरण उल्लंघनाच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली आहे. या संदर्भात 'पुणे टाइम्स मिरर'ने १८ ऑक्टोबरच्या अंकात सविस्तर वृत्त दिले होते.

रहिवाशांनी येथे सुरू असलेल्या बांधकामामुळे वायू आणि ध्वनिप्रदूषणाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली होती. तक्रारींचे निराकरण करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल एमपीसीबीने सायबेजविरुद्ध कायदेशीर कारवाईचा प्रारंभिक इशारा दिला. मात्र, प्रत्यक्षात कारवाईसाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. यामुळे रहिवाशांचा अपेक्षाभंग झाला. अखेर बांधकामामुळे होत असलेल्या वायू आणि ध्वनिप्रदूषणाला वैतागून कुमार कृती सोसायटीच्या रहिवाशांनी बिल्डरला कायदेशीर नोटीस पाठवण्याचा निर्णय घेतला.

### तक्रार करूनही कारवाई नाही

» एमपीसीबीकडून कारवाई होत नसल्याने निराश झालेल्या रहिवाशांनी हे प्रकरण स्वतःच्या हातात घेतले. १० वर्षांखालील अंदाजे ५० टक्के मुले आणि २५ टक्के ज्येष्ठ नागरिकांसह दोन हजाराहून अधिक रहिवासी अनेक महिन्यांपासून प्रदूषण आणि त्याच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर होत असलेल्या प्रतिकूल परिणामांचा सामना करत आहेत. या रहिवाशांनी पुणे पोलीस आणि पुणे महापालिकेच्या वरिष्ठांकडे याबाबत तक्रार केली. मात्र, कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे रहिवाशांनी एकजूट दाखवत सायबेज सॉफ्टवेअर कंपनीने सुरू असलेल्या बांधकामाशी संबंधित बिल्डरला कायदेशीर नोटीस पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

# भोसरी विधानसभा मतदारसंघातील नऊ उमेदवारांना निवडणूक विभागाकडून नोटीसा...

## भोसरी विधानसभा मतदारसंघ निवडणूकीच्या अनुषंगाने उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची पहिली तपासणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघ निवडणूकीच्या अनुषंगाने उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची पहिली तपासणी रविवारी (दि.१०) पुर्णानगर चिखली येथील महापालिकेच्या बहुउद्देशीय सभागृह, सेक्टर क्र.१८ येथे पार पडली. त्रुटीनुसार काही खर्च बँक खात्यातून न केल्याबद्दल ९ जणांना नोटीस दिली असून याबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच एका उमेदवाराला त्यांच्या स्वतःच्या वाहनावरील इंधनाच्या खर्चाबाबत दैनंदिन नोंद दर्शविण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.




निवडणूक खर्च निरीक्षक प्रेम प्रकाश मीना यांच्या उपस्थितीत, निवडणूक खर्च तपासणी प्रमुख मलप्पा वाघमारे वैजिनाथ आव्हाड, मनोज हिंगे व सहाय्यक खर्च निरीक्षक राजेशकुमार कुशवाहा यांच्या अधिपत्याखाली उमेदवारांनी केलेल्या दैनंदिन खर्चाची तपासणी प्रक्रिया पार पडली.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवाराच्या प्रचार खर्चाची मर्यादा ४० लाख रूपये आहे. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ११ उमेदवार निवडणूक लढवत असून त्यांचे दररोजच्या खर्चाचे लेखे व खर्चाच्या पावत्या या लेखांकन पथकाकडे जमा केल्या जातात. त्याचवेळी रजिस्टरमध्ये उमेदवाराचा रोजचा प्रचार खर्च नोंदवला जातो.

भारत निवडणूक आयोग कार्यालयाकडील निवडणूक खर्च संनियंत्रण संदर्भातील तरतूदीनुसार उमेदवारांनी केलेल्या दैनंदिन खर्चाची तपासणी करण्यात येत आहे. ही तपासणी तीन टप्प्यांत करण्याचे नियोजन आहे. उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची दुसरी तपासणी १४ नोव्हेंबरला तर तिसरी तपासणी १९ नोव्हेंबरला सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी दिली.

उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी निवडणूक आयोगाच्या नियमांप्रमाणे करण्यात आली असून निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेला खर्च तपासला जात आहे. पुढील तपासणीसाठी विहित वेळेत खर्चाचा तपशील सादर करावा, अशी सूचना देखील निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी सर्व उमेदवारांना दिली आहे.

# मी 4158 कोटींचा विकास निधी तालुक्यासाठी आणला, तुम्ही 8000 कोटींचा शब्द तरी द्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

ही काळ्या दगडावरची रेघ आहे. केंद्रातही महायुतीचेच सरकार आहे. त्यामुळे तालुक्यातील महाविकास आघाडी पुरस्कृत अपक्ष उमेदवाराला निवडून दिले तरी तो तालुक्यासाठी किती विकास निधी आणू शकतो, असा सवाल आमदार शेळके यांनी केला.

नवलाख उंबरे येथे गणेशआप्पा ढोरे, संतोष दाभाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विक्रम कदम, कृति समिती अध्यक्ष देविदास पडवळ, माजी उपसरपंच रवींद्र कडलक, राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दल अध्यक्ष जालिंदर शेटे, सरपंच सविता बदले, उपसरपंच राहुल शेटे, माजी सरपंच पांडुरंग कोयते, माजी उपसरपंच हनुमंत कोयते, मयूर नरवडे तसेच अशोक जगनाडे, नवनाथ पडवळ, युवा उद्योजक राजू कडलक, तानाजी पडवळ, चंद्रकांत कदम, लक्ष्मण नरवडे, बळीराम मराठे आदी मान्यवर, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाधववाडीत मताधिक्याचा निर्धार..

» जाधववाडी येथेही आमदार शेळके यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यावेळी अर्जुन जाधव, सोसायटीचे अध्यक्ष तानाजी जाधव, उपाध्यक्ष बबन जाधव, प्रसिद्ध गडा मालक किरण जाधव, उद्योजक चंद्रकांत जाधव, ग्रामपंचायात सदस्य गोरख काळोखे तसेच मनोहर जाधव, मुरली जाधव, राजू जाधव आणि महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जाधववाडीत आमदार शेळके यांना विक्रमी मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार उपस्थित ग्रामस्थांनी केला.

### सुदुंबरे येथे जंगी स्वागत..

» सुदुंबरे गावात भव्य मिरवणुकीने आमदार शेळके यांचे स्वागत करण्यात आले. सुवासिनींनी औक्षण करून त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. संत जगनाडे महाराज समाधी मंदिर परिसरत विकास आराखड्याच्या माध्यमातून गावाच्या विकासाला गती दिल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदारांना धन्यवाद दिले. गावाच विकास अधिक गतीने होण्यासाठी आमदार शेळके यांनाच पुन्हा प्रचंड मताधिक्याने निवडून देण्याचा निर्धार या वेळी करण्यात आला. त्यावेळी सरपंच सविता गाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुदुंबरे अध्यक्ष संतोष गाडे तसेच ताराचंद गाडे, माणिक गाडे, मोहन काळडोके, बाळा अंबुले, जालिंदर गाडे, उमा शेळके यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीसाठी पालिकेचे 5 हजार कर्मचारी

## सगळे दैनंदिन कामकाज ठप्प : नागरिकांच्या कामकाजाचा खोळंबा

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक कामासाठी महापालिकेच्या तब्बल ५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेमले आहे. अधिकारी व कर्मचारी हे इलेक्शन ड्यूटीत व्यस्त असल्याने महापालिका व क्षेत्रीय कार्यालये ओस पडली असून, दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत असल्याने त्यांच्याकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.



विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी पुणे विभागीय कार्यालयाने निवडणूक कामासाठी महापालिकेच्या संभाव्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या याद्या तयार केल्या होत्या. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर तत्काळ संबंधितांना कामकाजाच्या ठिकाणी नेमणूक देण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासोबत साहाय्यक निवडणूक अधिकारी, झोनल ऑफिसर व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात काही अधिकारी व कर्मचारी तैनात आहेत. मतदान केंद्रावर लागणाऱ्या साहित्याची तयारी सुरू आहे. ईव्हीएम, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट मशिनची ने-आण देखभाल तसेच, विविध पथके तसेच, कामकाजासाठी कर्मचारी नेमले आहेत. मतदान यंत्राच्या तपासणी आणि प्रशिक्षणाचे कामकाज सुरू आहे.

**पालिका भवन आणि क्षेत्रीय कार्यालये ओस**

आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रभावित करणाऱ्या अनेक योजना थांबवण्यात आल्या आहेत. तसेच, बहुतांश अधिकारी व कर्मचारी इलेक्शन ड्यूटीला असल्याने कामकाज जवळजवळ ठप्प आहे. इलेक्शन ड्यूटीमुळे त्या कर्मचाऱ्यांना महापालिका कामकाजातून तसेच, थंम्ब इम्प्रेशनमधून सूट देण्यात आली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थित नसल्याने महापालिका भवन आणि क्षेत्रीय कार्यालये ओस पडली आहेत.

**पाच हजार अधिकारी-कर्मचारी इलेक्शनसाठी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा निवडणूक कामकाजासाठी महापालिकेचे तब्बल ५ हजार १७७ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये वर्ग दोन व तीनचे २ हजार ३५२, वर्ग चारचे १ हजार ६१० कर्मचारी, पीआरओ, एफपीओ, ओपीओ, बीएलओ, झेडओ, एमओ आदींसाठी १ हजार २१५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी १ हजार १४० अधिकारी व कर्मचारी, पिंपरी मतदारसंघासाठी १ हजार ४१९ अधिकारी व कर्मचारी आणि भोसरी मतदारसंघासाठी १ हजार ८ कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

### इलेक्शननंतर कामकाज सुरळीत


» महापालिकेच्या संबंधित कामासाठी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, माजी नगरसेवक, पदाधिकारी हे महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांस फोन करून संपर्क साधतात. आता त्यांना संपर्क केला असता इलेक्शन ड्यूटीला आहे, असे उत्तर दिले जाते. काही जण फोन उचलताच, एसएमएस करून इलेक्शन ड्यूटी असल्याचे सांगून मोकळे होतात. त्यामुळे कामासाठी कोणाला संपर्क साधायचा, असे प्रश्न नागरिकांसह पदाधिकाऱ्यांना पडला आहे. २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन निकाल लागल्यानंतर आचारसंहिता शिथिल होणार आहे. त्यानंतर सर्व अधिकारी व कर्मचारी इलेक्शन ड्यूटीतून मुक्त होणार आहेत. त्यानंतर महापालिकेचे कामकाज सुरळीत सुरू होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उमेदवार पसंत नसल्याने मतदारांची नोटाला पसंती

## पिंपरी-चिंचवड शहरात 'नोटा'चाही मोठा मतदार, चिंचवडमध्ये नोटाला सर्वाधिक 5 हजार 874 मतदान

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ विधानसभा मतदारसंघात मतदारांना उमेदवार पसंत नसल्याने 'नोटा' लाही मोठे मतदान होत आहे. यामध्ये चारही विधानसभा मतदारसंघातील २०१९ च्या निवडणुकीत १४ हजार २४६ मतदारांनी नोटाला मतदान केले. चिंचवड मतदारसंघात नोटाला सर्वाधिक ५ हजार ८७४ मतदान झाले, तर मावळात सर्वात कमी १ हजार ४९० मतदारांनी नोटाला मतदान केले आहे.




निवडणूक आयोगाने मतदानासाठी १९९० पासून ईव्हीएम मशिनचा वापर सुरू झाला. त्यापूर्वी बॅलेट पेपरवर मतदान होत असे. ईव्हीएमवर २०११ मध्ये नोटाचा वापर सुरू झाला. त्यापूर्वी नोटा अस्तित्वात नव्हता. उमेदवारांची नावे आणि त्यांच्या चिन्हानंतर सर्वात शेवटी यापैकी कुणीच नाही म्हणजे नोटा या पर्यायाचा वापर सुरू झाला. सरासरी दरवर्षी प्रत्येक मतदारसंघात ०.५० ते दोन टक्के पर्यंत नोटाला मतदान होते.

लोकसभा निवडणुकीत तीन ते पाच टक्क्यांपर्यंत नोटाला मतदान झालेले आहे. ईव्हीएम मशिनवर दर्शविलेल्या २०११ मध्ये उमेदवारांपैकी कोणालाही मत द्यायचे नसेल तर, वरीलपैकी कोणीही नाही म्हणजे नोटा हा पर्याय निवडणे मतदारांना शक्य झाले. संख्या ही अधिक असेल तर, ती निवडणूक रद्द होते. संबंधित मतदारसंघात फेरनिवडणूक घेतली जाते. आतापर्यंत असा प्रसंग उद्भवलेला नाही. २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीत चारही मतदारसंघात एकूण ११ हजार ९१ मतदान नोटाला झाले होते. त्यामध्ये सर्वात जास्त पिंपरी मतदारसंघात ४ हजार ४३२ मतदान नोटाला झाले होते. त्या खालोखाल चिंचवड मतदारसंघात ३ हजार २०३ मतदारांनी नोटाला मतदान केले होते, तर भोसरी मतदारसंघात १ हजार ४४७ मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला होता. सगळ्यात कमी मावळ मतदारसंघात २ हजार मतदारांनी नोटाला पसंती दिली होती.

पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ विधानसभा मतदारसंघात मतदारांना उमेदवार पसंत नसल्याने 'नोटा' लाही मोठे मतदान होत आहे. यामध्ये चारही विधानसभा मतदारसंघातील २०१९ च्या निवडणुकीत १४ हजार २४६ मतदारांनी नोटाला मतदान केले. चिंचवड मतदारसंघात नोटाला सर्वाधिक ५ हजार ८७४ मतदान झाले, तर मावळात सर्वात कमी १ हजार ४९० मतदारांनी नोटाला मतदान केले आहे.

### 2019 ला 14 हजार मतदार

» २०१९ ला विधानसभा निवडणुकीत चारही मतदारसंघात एकूण १४ हजार २४६ मतदान नोटाला झाले होते. त्यामध्ये सर्वात जास्त चिंचवड मतदारसंघात ५ हजार ८७४ मतदान नोटाला झाले होते. त्या खालोखाल पिंपरी मतदारसंघात ३ हजार २४६ मतदारांनी नोटाला मतदान केले होते, तर भोसरी मतदारसंघात ३ हजार ६३६ मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला होता. सगळ्यात कमी मावळ मतदारसंघात १ हजार ४९० मतदारांनी नोटाला पसंती दिली होती.

# महिला प्रवाशांचा प्रवास होणार सुरक्षित

## राज्यातील सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनांमध्ये होणार पॅनिक बटन कार्यान्वित

**पुणे | प्रतिनिधी**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वाहनांमधील पॅनिक बटन यंत्रणेच्या कामकाजाचे कमांड कंट्रोल रूम, अंधेरी येथील परिवहन कार्यालयात आता तयार झाले आहे. येथून राज्यभर ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या सॉफ्टवेअरची चाचणी सुरू आहे. महिनाभरानंतर चाचणी पूर्ण झाल्यावर राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वाहनांमध्ये ती कार्यान्वित होईल. यामुळे महिला प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होणार आहे.

दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर महिलांचा बस प्रवास सुरक्षित व्हावा, महिलांवर प्रवासादरम्यान बसमध्ये कोणतेही संकट आले तर त्यांना तत्काळ मदत मिळावी, या उद्देशाने बसमध्ये पॅनिक बटण यंत्रणा बंधनकारक करण्यात आली. मात्र, त्याची अंमलबजावणी गेली सहा वर्षांपासून झालीच नाही.



वाहनांमध्ये पॅनिक बटन आहेत. मात्र, ते नावालाच...! ते दाबले तर कोणत्याही सुरक्षा यंत्रणेला याबाबतची माहितीच जात नाही. त्यामुळे या वाहनांमध्ये पॅनिक बटण असून, महिलांची, मुलींची सुरक्षा फक्त नावालाच होती. मात्र, ही यंत्रणा कार्यान्वित व्हावी याकरिता कमांड कंट्रोल रूम उभारण्यासाठी शासनाने 20 कोटी 70 लाख रुपयांची तरतूद केली होती.

त्यानुसार अंधेरी परिवहन कार्यालय येथे कमांड कंट्रोल रूम तयार करण्यात आले आहे. चाचणी झाल्यावर ते राज्यभरातील सार्वजनिक व्यवस्थेच्या वाहनांसह खासगी वाहनांमध्येही कार्यान्वित केले जाणार आहे. या वेळी कोणत्याही महिलेने संकटकाळी हे बटन दाबले तर त्यांना तत्काळ सुरक्षा यंत्रणांची मदत मिळणार आहे, यामुळे महिला प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

### अशी झाली पॅनिक बटन यंत्रणेची भागदौड

प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेत, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सर्व टॅक्सी, बस आणि सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये व्हीटीएस किंवा जीपीएस आणि पॅनिक बटन बसविण्याची सक्ती केली होती. या निर्णयाची अंमलबजावणी 01 एप्रिल 2018 पासून करण्याबाबतचे परिपत्रक यापूर्वीच काढण्यात आले आहेत. तेव्हापासून आत्तापर्यंत अंमलबजावणीसाठी शासनाने उदासिनताच दाखविली होती.

त्यानंतर परिवहन विभागाने 01 जानेवारी 2019 नंतर नोंदणी होणाऱ्या नव्या वाहनांना पॅनिक बटन, व्हीटीएस बसविणे बंधनकारक केले. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही यंत्रणा कार्यान्वित झाली नव्हती, अखेर शासनाने ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी 20 कोटी 70 लाख रुपयांची तरतूद केली. त्यानंतर आता या निधीतून अंधेरी येथे कमांड कंट्रोल रूम तयार केले आहे. याच्या चाचणीनंतर महिनाभरानंतर ते कार्यान्वित होणार आहे.

### महिलांना अशी मिळणार तत्काळ मदत

» सार्वजनिक वाहतुकीच्या प्रवासी वाहनातून प्रवास करणाऱ्या महिलांना असुरक्षित वाटू लागल्यास किंवा बसमधील सहप्रवासी किंवा गाडीच्या चालकाकडून गैरकृत्य केले गेल्यास मदत मागण्यासाठी पॅनिक बटनचा वापर करता येणार आहे. हे बटन दाबल्यानंतर संबंधित कंट्रोल रूमला त्याची माहिती मिळेल. तसेच, व्हीटीएसद्वारे वाहनाचे लोकेशनही माहिती होईल. यासाठी परिवहन विभागाकडून अंधेरी येथे राज्यस्तरीय कमांड कंट्रोल सेंटर उभारण्यात आले आहे. राज्यभरातील वाहनांच्या देखरेखीचे कामकाज येथूनच चालणार आहे. येथे पॅनिक बटनाद्वारे माहिती आल्यास महिला, मुली व ज्येष्ठ प्रवाशांना तत्काळ मदत मिळणार असून, त्यांची सुरक्षा करणे सोपे होणार आहे.

# पुणे रेल्वे विभागाचे वेळापत्रक कोलमडले!

## नियमित गाड्यांव्यतिरिक्त विशेष गाड्या धावल्याने मार्गावर ताण

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे विभागाने दिवाळी आणि छटपूजेसाठी गावी जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची सोय व्हावी, या उद्देशाने नियमित गाड्यांव्यतिरिक्त अडीचशेहून अधिक विशेष गाड्या सोडल्या. नियमित गाड्यांशिवाय अतिरिक्त गाड्या धावल्याने मार्गावर ताण येऊन वेळापत्रक कोलमडले. अनेक गाड्यांना दोन तासांपासून ते दहा तासांपर्यंत उशीर होत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या मनस्तापात भर पडली असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत आहेत.



पुण्यात नोकरी, शिक्षणाच्या निमित्ताने राहणाऱ्यांची संख्या मोठी आहे. हे नागरिक दिवाळी आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांमध्ये आवर्जून गावी जातात. त्यामुळे या काळात रेल्वे गाड्यांना खूप गर्दी असते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नियमित गाड्यांसोबत जादा गाड्या सोडण्याचे नियोजन दर वर्षी केले जाते. पुण्यातून दररोज सुमारे दोनशे गाड्या धावतात. सुट्ट्यांच्या कालावधीत प्रामुख्याने उत्तर प्रदेश बिहार, नागपूर, लातूरसाठी जादा गाड्या सोडण्यात येतात. यंदाही रेल्वे प्रशासनाने अडीचशेहून अधिक विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन केले. त्यानुसार, ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात १००हूनअधिका गाड्या सोडण्यात आल्या. चालू महिन्यात दीडशेहून अधिक विशेष गाड्या सोडण्याचे नियोजनआहे. विशेष गाड्यांमुळे नियमित गाड्यांचे वेळापत्रक कोलमडल्याचे दिसून आले आहे.

पुण्यातून सुटणाऱ्या काही नियामत आण विशेष गाड्याना दोन तासांपासून ते १० तासांपर्यंत उशीर होत आहे. त्यामुळे गावी जाण्याचे नियोजन केलेल्या प्रवाशांना गाडी सुटण्याची वाट पाहात ताटकळत थांबावे लागत आहे. गाड्यांना नेहमीपेक्षा उशीर होत असल्यामुळे प्रवाशांच्या नियोजनाचा फियास्को होत आहे. गेल्या काही दिवसांत पुणे-जबलपूर, हमसफर एक्स्प्रेस, आझाद हिंद एक्स्प्रेस, सोलापूर-अजमेर, दानापूर, पुणे-मुझफ्फरपूर या गाड्यांना उशीर झाला आहे.

> “ प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वेकडून गाड्या चालविण्यात आल्या. याशिवाय राज्याच्या विविध भागांतूनही जादा गाड्या धावल्या. नियमित आणि विशेष गाड्यांमुळे मार्गावरीस गर्दी वाढल्याने उशीर होत आहे. या संदर्भातील सर्व माहिती प्रवाशांना एसएमएसद्वारे कळविण्यात येत आहे.
>
> - रामपाल बडपग्गा, जनसंपर्क अधिकारी, पुणे रेल्वे विभाग.